## नि.दि.मु.क्र.११०/२०१२ मधील निशाणी क्र.१४७ वरील आदेश

## (**CNRNo.MHSI**080004852012)

०१. प्रस्तूत अर्जान्वये वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.५ रघुनाथ तुकाराम कदम, प्रतिवादी क्र.६अ मधुकर सिताराम कदम व प्रतिवादी क्र.१३ शांताराम दत्ताराम कदम यांचे कायदेशीर वारस दाखल करण्यास झाला विलंब माफ करुन वारस दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.५ हे दि.०४/०६/२०२१, , प्रतिवादी क्र. ६अ दि.१३/१२/२०२१ व प्रतिवादी क्र.१३ हे दि.२८/०४/२०२१ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र.५, ६अ व १३ यांचे मुदतीत रेकॉर्डवर आणणे आवश्यक होते. वादी हे भोम येथे वास्तव्यास असल्याने व वर नमुद प्रतिवादी हे त्यांचे संपर्कात नसल्याने ते मयत असल्याबाबत वादींना कोणतीही माहिती नाही. अलीकडेच नातेवाईकांमार्फत सदर प्रतिवादी मयत असल्याबाबत वादी यांना माहिती मिळाली. प्रतिवादी क्र.५ चे वारस अभिलेखावर आणणेस १ वर्षे १० महिने, प्रतिवादी क्र.६अ चे वारसांकरीता २ वर्षे ३ महिने व प्रतिवादी क्र.१३ करीता २ वर्षे ९ दिवस इतका विलंब झाला आहे. सदर विलंब माफ होऊन न मिळाल्यास वादीचे कायदेशीर न्याय हक्कावर बाधा येऊन त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, अर्ज मंजूर करणेबाबत प्रस्तूत वादी यांनी विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे नि.क्र.१६७ येथे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत अर्ज खोटा व खोडसाळ आहे. प्रतिवादी क्र.५, ६अ व १३ हे मयत असल्याबाबतची माहिती वादी यांना होती तरी देखील त्यांनी सदर प्रतिवादींचे वारस अभिलेखावर आणणेस निष्काळजीपणा व दिरंगाई केली

आहे. वादीच्या निष्काळजीपणामुळे सदर विलंब झाला आहे. वादी यांनी अर्जात कोणतेही योग्य व समर्पक कारण दिलेले नाही. सबब, अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३. अर्ज व त्यावरील जबाब तसेच, उभय पक्षाच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद लक्षात घेऊन अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र.५ रघुनाथ तुकाराम कदम, प्रतिवादी क्र.६अ मधुकर सिताराम कदम व प्रतिवादी क्र.१३ शांताराम दत्ताराम कदम हे वर नमुद तारखांना मयत झाल्याचे दिसून येते. प्रस्तूतचा दावा वाटपाकरीता दाखल केला आहे. प्रस्तूत प्रतिवादींचे वारस हे दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. वादी यांचेकडून झालेल्या विलंबाची नुकसान भरपाई म्हणून प्रतिवादींना खर्च देण्याबाबत आदेश पारीत करणे न्यायाचे होईल. त्यामुळे, वरील कारणमिमांसेचा सारांश असा की, प्रस्तूत अर्ज नि.क्र.१४७ हा मंजूर करणे योग्य वाटते. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

**– आदेश –**

०१. निशाणी क्र.१४७ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादी क्र.५, ६अ व १३ चे वारस मुदतीत अभिलेखावर आणणेस झालेला विलंब न्यायपुर्ततेकरीता माफ करण्यात येत आहे. वादीने प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांना खर्च म्हणून रक्कम रु.५००/– द्यावेत.

SHUBHAM GOVIND LATURIYA
Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA
Date: 2026.03.11 17:31:38 +0530

(शुभम जी. लटुरिया)

दिनांक : ११/०३/२०२६ न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय, वैभववाडी